# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.२६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २०/०८/२०१६.

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार महानगरपालिकांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

१.१ आणि ज्याअर्थी, भारतीय संविधान व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील (सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५९) तरतुदीनुसार महानगरपालिकांची मुदत संपण्यापूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

१.२ आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का-५, दिनांक- २७/१/२००५ अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत.

१.३ आणि ज्याअर्थी, शासनाने सर्व महानगरपालिकांमध्ये (बृहन्मुंबई वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्याबाबत दिनांक १९/५/२०१६ रोजी "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक ९)" काढून अधिनियमात दुरुस्ती केली आहे व तसेच आरक्षण

निश्चितीकरिता दिनांक १३/६/२०१६ रोजी "महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६" केले आहेत;

१.४ आणि ज्याअर्थी, वरील कारणास्तव (एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती) राज्य निवडणूक आयोगाचे यापूर्वीचे प्रभाग रचनेबाबतचे खालील आदेश अधिक्रमित करून सुधारित आदेश काढणे आवश्यक झाले आहे.

(i) क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-०५, दिनांक ०३/०५/२००५.

(ii) क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. ५/का-५, दिनांक १०/०७/२००९.

(iii) क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२६/का-५,दिनांक०६/०२/२०१५.(प्रभाग रचनेबाबतच्या विवरणपत्रांबाबत)

(iv) क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२६/का-५,दिनांक०६/०२/२०१५.(आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याबाबत)

२. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून मी ज. स. सहारिया, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, नागरी क्षेत्रातील प्रभाग रचनेबाबतचे परिच्छेद १.४ मध्ये उल्लेखिलेले सर्व आदेश (दिनांक ०३/०५/२००५, दिनांक १०/०७/२००९ व दिनांक ०६/०२/२०१५ चे आदेश) अधिक्रमित करून बृहन्मुंबई वगळता अन्य महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

३. आदेश

३.१ राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. त्यांनी राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात. महानगरपालिका आयुक्तांनी त्यांच्या मदतीसाठी उत्कृष्ट व प्रामाणिक अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या एका कोअर समितीची स्थापना करावी.

३.२ प्रभाग रचना करण्याबाबतचे मुख्य टप्पे खालील प्रमाणे आहेत :-

(i) प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागांसह) तयार करणे.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे.

(iii) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv) प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

(v) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांना सुनावणी देणे.

(vi) अंतिम प्रभाग रचना तयार करणे व त्यास मान्यता घेऊन प्रसिध्दी देणे.

४. **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागांसह) तयार करणे-**

(४.१) **गृहित धरावयाची लोकसंख्या:-** जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या २०११ च्या जनगणनेनुसार महानगरपालिका क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या व प्रगणक गटाचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावेत. या लोकसंख्येच्या आधारावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ व ५अ मधील तरतुदीनुसार परिशिष्ट-१ मध्ये दिल्यानुसार सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना करण्यात यावी.

(४.२) महानगरपालिकेच्या गुगल अर्थ किंवा तत्सम इतर नकाशावर प्रगणक गटांची मांडणी करण्यात यावी. अशी मांडणी करताना महानगरपालिकेचे कोणतेही क्षेत्र सुटणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(४.३) **प्रभागांची संख्या ठरविणे :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात आलेली महानगरपालिकेची सदस्य संख्या विचारात घेऊन शक्य असेल तेथवर ४ सदस्यांचे प्रभाग करावयाचे आहेत. सर्व प्रभाग ४ सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग ३

सदस्यांचे होतील. असे ३ अथवा ५ सदस्यांचे प्रभाग कोणत्या क्षेत्रात राहतील हे भौगोलिक सलगता राखण्याच्या दृष्टीने प्रभाग रचना करताना मतदारांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी ठेवण्यात यावेत. याकरिता प्रत्यक्ष प्रभाग रचना करण्याबाबतचे इतर निकषदेखील विचारात घ्यावेत. मात्र, अशी कोणतीही परिस्थिती नसल्यास शेवटचे प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचे राहतील. महानगरपालिका क्षेत्राचे प्रभाग पाडल्यानंतर प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येनुसार प्रभागातील जागांना प्रभागाच्या अनुक्रमांकासह यथास्थिती "अ", "ब", "क", "ड" व "इ" असे संबोधण्यात यावे. त्यानुसार उदा. प्रभाग क्रमांक-४२ मध्ये ५ जागा असल्यास त्यांना "४२अ", "४२ब", "४२क", "४२ड" व "४२इ" असे संबोधण्यात येईल.

(४.४) **प्रभागांची सरासरी लोकसंख्या:-** प्रभाग रचना करताना महानगरपालिकेची २०११ च्या जनगणनेनुसारची एकूण लोकसंख्या भागिले महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या गुणिले प्रत्येक प्रभागातील सदस्यांची संख्या या सूत्रानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

(४.५) प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी.

(४.६) प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात :-

(अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(क) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

(ड) प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने, स्मशानभूमी, बाजारहाटाच्या जागा, पाणी पुरवठयाच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा, इ.चा वापर ज्या नागरिकांकडून करण्यात येतो त्या नागरिकांचा समावेश असलेल्या प्रभागातच शक्यतोवर त्या सोयी सुविधा ठेवण्यात याव्यात.

(इ) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक शाळा, मैदाने, इ. शक्यतोवर त्याच प्रभागात ठेवण्यात याव्यात, इत्यादी.

(४.७) प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, फलायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर इ.चा उल्लेख प्रामुख्याने यावयास हवा.

(४.८) प्रभाग रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक असेल व घरयादी उपलब्ध

नसेल, तर त्या प्रकरणी सोबतच्या परिशिष्ट-८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली आहे, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर रहात होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

(४.९) प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील सर्वसाधारण नागरिकांना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

(४.१०) प्रभाग रचनेमध्ये प्रभागांना अनुक्रमांक देण्यात येतात. प्रभागाचे क्षेत्र चटकन लक्षात यावे याकरिता प्रभागांना अनुक्रमांकासोबत प्रभागाचे नाव देता येईल किंवा कसे हे तपासावे. प्रभागांना नाव देणे हे बंधनकारक नाही. तथापि, महानगरपालिका आयुक्त प्रभागांना नाव देण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. प्रभागांना नाव द्यावयाचे झाल्यास ते अशाप्रकारे देण्यात यावे जेणेकरुन सदर प्रभाग कोणत्या क्षेत्रातील आहे हे तात्काळ लक्षात येईल. उदा. त्या प्रभागातील प्रसिध्द असलेले महत्वाचे ठिकाण अथवा त्या प्रभागातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले एखादे नगर अथवा वस्ती, इ.

(४.११) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ च्या परिच्छेद-३ व ४ नुसार कार्यवाही करावयाची आहे.

(४.१२) **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असल्यास:-** अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीकरिता एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास ती जागा

अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने ठरविण्यात यावे. मात्र मागील निवडणुकीत जर ती जागा यथास्थिती अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित असेल तर ती जागा या निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित होणार नाही.

(४.१३) **यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे तयार करावा.**

(i) व्यवस्थित माहिती भरलेले परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-८

(ii) गुगल अर्थ किंवा तत्सम नकाशा, या नकाशावर प्रगणक गटांच्या सीमा हिरव्या रंगाने दर्शवाव्यात. प्रगणक गटांचे क्रमांक व त्या प्रगणक गटांची लोकसंख्या दर्शवावी.

(iii) जनगणना प्रभागांच्या (Census Ward) सीमा निळया रंगाने दर्शवाव्यात.

(iv) नकाशावर शहरातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(v) नवीन निवडणूक प्रभागांच्या हद्दी लाल रंगाने दर्शविण्यात याव्यात.

(vi) नकाशांचा आकार, नकाशावर दर्शविलेले प्रगणक गटांचे क्रमांक, लोकसंख्या, इत्यादी तपशील वाचता येईल या प्रमाणात असावा. नकाशे सुलभपणे हाताळता यावेत याकरिता आवश्यक असल्यास दोन किंवा तीन भागात तयार करावेत.

(vii) प्रत्येक प्रभागाचा स्वतंत्र नकाशा तयार करावा, त्याच्या हद्दी स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात. त्या हद्दींवर असणारे रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे नकाशावर नमूद करावेत.

(viii) प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

५. **प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे -**

सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेची तपासणी महानगरपालिका आयुक्त, संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची समिती करेल. प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्यात आलेली आहे याची तपासणी करुन त्याबाबत सदर समिती राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात प्रमाणपत्र देईल (प्रमाणपत्राचा नमुना स्वतंत्ररित्या पाठविण्यात येईल). या प्रमाणपत्रासह प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेकरिता पाठविण्यात यावा.

६. **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे-**

(६.१) राज्य निवडणूक आयोगाने प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

(६.२) शासनाने दिनांक १३ जून, २०१६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ केले आहेत. त्यानुसार आरक्षित प्रभाग निश्चित करण्याची कार्यवाही करावयाची आहे. या नियमामधील तरतुदीनुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ ही निवडणूक प्रथम निवडणूक असल्याचे मानण्यात येईल.

(६.३) आरक्षण निश्चित करताना प्रत्येक प्रभागात उपलब्ध असलेली पहिली जागा ही त्या त्या प्रवर्गाकरिता आरक्षित होईल. उदा. प्रभाग क्रमांक-५ व १७ हे अनुसूचित जातीकरिता आरक्षित होत असल्यास त्या प्रभागातील जागा क्रमांक-५अ व १७अ हे अनुसूचित

जातीकरिता आरक्षित होतील. त्यानंतर अनुसूचित जमातीच्या उतरत्या क्रमाने प्रभाग क्रमांक-१७ हाच अनुसूचित जमातीकरिता आरक्षित होत असल्यास त्या प्रभागातील जागा क्रमांक-१७ब ही अनुसूचित जमातीकरिता आरक्षित होईल. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची प्रत्येक प्रभागात किमान एक जागा देय होते. त्यानुसार ज्या प्रभागात अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे आरक्षण नाही त्या प्रभागातील "अ" जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित होईल. प्रभाग क्रमांक-५ मधील जागा क्रमांक-५ब नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित होईल तर प्रभाग क्रमांक-१७ मधील जागा क्रमांक-१७क ही जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित होईल. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या उर्वरित जागांचे वाटप करताना महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागामध्ये राखीव जागांचे वाटप करणे व त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ दिनांक-१३/६/२०१६ अनुसार अनुज्ञेय असलेल्या प्रत्येक प्रभागातील उपलब्ध असलेल्या एका जागेची चिठ्ठी घेऊन अशा चिठ्ठयांमधून सोडतीने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या उर्वरित जागा निश्चित कराव्यात.

(६.४) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ च्या परिच्छेद ५ व ६ अनुसार कार्यवाही करावी.

(६.५) महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली सोडत काढावी.

(६.६) सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठया प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका मुख्यालय / प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड / वेब साईट, इत्यादी)

आरक्षणाची सोडत काढण्याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना परिशिष्ट-९ व १० मध्ये देण्यात आला आहे.

(६.७) महानगरपालिका निवडणुकांकरिता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे सोबतच्या परिशिष्ट-११ मध्ये नमूद करण्यात आलेली आहेत. तसेच सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील परिशिष्ट-१२ व १३ मध्ये नमूद करावा.

(६.८) सोडतीचा निकाल वेबसाईटवर टाकण्यात यावा.

७. प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे-

(७.१) "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५" मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर महानगरपालिका निवडणुकांकरितासुध्दा सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली ही कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक- ३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे योग्य असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता कोणते प्रभाग आरक्षित होतील, हे निश्चित करण्यात येईल व त्यानंतर सदर आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

(७.२) महिला व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची सोडत काढल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना महानगरपालिका आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द करावी. (मराठी व इंग्रजीमध्ये) (याबाबतच्या अधिसूचनेचा नमुना परिशिष्ट-१४ व १५ मध्ये देण्यात आलेला आहे.)

(७.३) प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेब साईट, इत्यादी)

(७.४) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना महानगरपालिका आयुक्तांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

८. **प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे-**

(८.१) राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व नेमून दिलेल्या दिनांकास सुनावणी द्यावी.

(८.२) या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था (उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

(८.३) सुनावणीच्यावेळी केलेली प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण सर्वांना दिसेल अशाप्रकारे स्क्रीनवर दर्शविण्यात यावे. प्रभागांच्या हद्दीबाबत असलेल्या हरकतींसंदर्भात गुगल अर्थच्या नकाशावर सध्याचे प्रारुप प्रभाग व हरकतदाराने प्रभागांच्या हद्दीमध्ये मागणी केलेले बदल स्क्रीनवर दाखविण्यात यावेत.

(८.४) हरकती व सूचनांना सुनावणी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम प्रभाग रचना

शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

९. **अंतिम प्रभाग रचना तयार करणे व त्यास मान्यता घेऊन प्रसिध्दी देणे-**

(९.१) सुनावणी देणारे प्राधिकारी, सुनावणीनंतर केलेल्या शिफारशी, महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करतील.

(९.२) राज्य निवडणूक आयोगाने प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर त्यानुसार प्रभाग रचनेमध्ये (सर्व विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना) योग्य ते बदल महानगरपालिका आयुक्त यांनी करावेत.

(९.३) त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाकडून, महानगरपालिका आयुक्तांमार्फत शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

(९.४) या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड / वेब साईट, राज्य निवडणूक आयोगाची वेबसाईट, इत्यादी) अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

(९.५) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.२३/का-५, दिनांक- १७ जुलै, २०१२ नुसार प्रभाग रचनेच्या (दोन्ही प्रारुप व अंतिम) प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशांवर महानगरपालिका आयुक्त तसेच संबंधित नगर रचनाकार (यथास्थिती सहायक संचालक, नगर रचनाकार) यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच सर्व परिशिष्टांवर महानगरपालिका आयुक्तांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

१०. **सर्वसाधारण-**

या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

( ज. स. सहारिया )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

सहपत्र :- परिशिष्ट १ ते ८ (प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावाबाबत)
परिशिष्ट ९ व १० (सोडतीच्या जाहीर सूचनेचा मराठी व इंग्रजी नमुना)
परिशिष्ट ११ (सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे)
परिशिष्ट १२ व १३ (सोडतीनंतर भरावयाची विवरणपत्रे)
परिशिष्ट १४ व १५ (प्रारुप प्रभाग रचना राजपत्रात प्रसिध्द करण्याकरिता मार्गदर्शक नमुना)

प्रति,
१. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
४. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
५. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठामध्ये नेमलेले वकील
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

## परिशिष्ट - १ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७

१. महानगरपालिकेचे नाव -

२. महानगरपालिका एकूण लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार) -

३. अनुसूचित जातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. अनुसूचित जमातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

५.निवडून द्यावयाच्या महानगरपालिका -
सदस्यांची संख्या

६. प्रभागांची एकूण संख्या -
४ सदस्य -
३ सदस्य -
५ सदस्य -

७. प्रभागाची सरासरी लोकसंख्या

$$\text{सूत्र} = \frac{\text{महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या (अनु.क्र.२)}}{\text{महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या (अनु.क्र.५)}} \times \text{प्रभागातील सदस्य संख्या}$$

| प्रभाग | सरासरी | कमाल (+) १०% | किमान (-) १०% |
|---|---|---|---|
| ४ सदस्य | | | |
| ३ सदस्य | | | |
| ५ सदस्य | | | |

८. अनुसूचित जातीकरीता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$(\text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातींची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{एकूण सदस्य संख्या})$$

९. अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग -

(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

( सूत्र = $\frac{\text{अनुसूचित जमातींची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}}$ × एकूण सदस्य संख्या )

१०. नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

( सूत्र = अनुक्रमांक ५ मधील एकूण सदस्य संख्या × $\frac{२७}{१००}$ )

११.अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा

( सूत्र = $\frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{२}$ )

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीसाठी

( सूत्र = $\frac{\text{अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$ )

२. अनुसूचित जमातीसाठी

( सूत्र = $\frac{\text{अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$ )

३. नागरिकांच्या मागासवर्गासाठी

( सूत्र = $\frac{\text{नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या}}{२}$ )

४.स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. ११ (अ) - [ अ.क्र.११ (ब१) + ११ (ब२) + ११ (ब३)] )

५. एकूण

१२. अराखीव

( सूत्र = अ.क्र. ५ - [ अ.क्र.८ + अ.क्र.९ + अ.क्र.१० + अ.क्र.११ ( ब४ )] )

सही

आयुक्त, महानगरपालिका

टीप :- स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

## परिशिष्ट २ (हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत)

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची व्याप्ती (प्रभागातील थोडक्यात महत्त्वाची ठिकाणे/परिसर/नगरे इ. नमूद करावीत) | प्रभागाच्या सीमा | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती / अनु.जमाती / नागरिकांच्या मागासवर्गासाठी व स्त्रियांसाठी (अनु.जाती / अनु. जमाती /नागरिकांच्या मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रभाग क्रमांक -<br>लोकसंख्या-<br>एकूण -<br>अ.जा. -<br>अ.ज. - | | | उत्तर -<br>पूर्व -<br>दक्षिण -<br>पश्चिम - | १-अ<br>१-ब<br>१-क<br>१-ड |

सही

आयुक्त, महानगरपालिका

टीप - हा नमुना इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये असावा.

| परिशिष्ट 3 (निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ELECTION WARDWISE INFORMATION | | | | | |
| ..................... MUNICIPAL CORPORATION | | | | | |
| Election Ward No. | Census Enumeration | | Total Population | SC | ST |
| | Ward No. | Block No. | | | |
| 1 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total | | | | | |
| 2 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total | | | | | |
| 3 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| परिशिष्ट ४ (प्रगणक गटनिहाय माहिती) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ENUMERATION BLOCKWISE INFORMATION | | | | | | |
| ..................... MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| SR. No. | Census Ward No. | Enumeration Block No. | Total Population | SC | ST | WARD NO. IN Which the EB is included |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| नमुना विवरणपत्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ..................... MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| SR. No. | Census Ward No. | Enumeration Block No. | Total Population | SC | ST | WARD NO. IN Which the EB is included |
| १ | १ | १ | .. | ... | ... | १ |
| २ | १ | २ | .. | ... | ... | ५ |
| ३ | १ | ३ | .. | ... | ... | ५ |
| ४ | १ | ४ | .. | ... | ... | १ |
| ५ | २ | १ | .. | ... | ... | ६ |
| ६ | २ | २ | .. | ... | ... | ६ |
| ७ | २ | ३ | .. | ... | ... | २ |
| ८ | २ | ४ | .. | ... | ... | २ |
| . | . | | | | | |
| . | . | | | | | |
| . | . | | | | | |
| . | . | | | | | |
| | याप्रमाणे | याप्रमाणे | | | | |

| परिशिष्ट ५ (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ..................... MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULE CASTE DESCENDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | SC% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

परिशिष्ट ६ (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम)

..................... MUNICIPAL CORPORATION

**STATEMENT SHOWING SCHEDULE TRIBE DESCENDING ORDER**

| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | ST% | RESVN |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## परिशिष्ट ७ (सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र)

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०१७

### . . . . . महानगरपालिका प्रभाग रचना

| लोकसंख्या | | | सरासरी | ३ सदस्य | ४ सदस्य | ५ सदस्य |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | किमान | | | |
| | | | कमाल | | | |

| एकूण सदस्य संख्या व आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण सदस्य | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
| | | | | |
| पैकी स्त्रियांसाठी आरक्षित पदे | | | | |
| | | | | |

| | | | | | | | | | पदांचे आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नवीन प्रभागाचा क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जाती लोकसंख्या | अनुसुचित जमाती लोकसंख्या | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जमाती लोकसंख्येची टक्केवारी | अनुसुचित जातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने अनुक्रमांक | अ | ब | क | ड | इ असल्यास | स्त्रियांसाठी | स्त्रियांसाठी | स्त्रियांसाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट - ८ (प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे)

जनगणना प्रभाग क्रमांक ----------- पैकी प्रगणक गट क्रमांक ------- फोडणे
आवश्यक ठरेल त्याची चौकशी करुन लोकसंख्या निश्चित केली त्याचा तपशिल

सर्वेक्षण केल्याची तारीख :-----------------

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | सन २०११ ची लोकसंख्या | अनुसूचित जाती (असल्यास लोकसंख्या) | अनुसूचित जमाती (असल्यास लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| १. प्रगणक गटाची लोकसंख्या | | | |
| २. फोडलेल्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण प्रमाणे निश्चित केलेली लोकसंख्या (वजा) | | | |
| ----------------------------------- | | | |
| ३. लगतच्या निवडणूक प्रभागांसाठी विचारात घ्यावयाची उर्वरित लोकसंख्या (वरील १ - २) | ----------------------------------- | | |

उपायुक्त
-------------महानगरपालिका

आयुक्त
-------------महानगरपालिका

## परिशिष्ट ९ (सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)

-----------महानगरपालिका

सार्वत्रिक निवडणूक २०१७

जाहीर सूचना

---------- महानगरपालिकेच्या सन ------- मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय तसेच संबंधित प्रभाग कार्यालयामध्ये मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| टीप : हरकती व सूचना दाखल करणा-या नागरीकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. | | |

**ठिकाण :-------------**

**आयुक्त,**

**-------महानगरपालिका**

**दिनांक :-------------**

परिशिष्ट १० (सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)

## ---------------MUNICIPAL CORPORATION

## GENERAL ELECTION 2017

**PUBLIC NOTICE**

**For the General Election of --------- Municipal Corporation to be held in the year -----------,The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women), Backward Class of citizens, Backward Class of citizens(women), Women from General Category and for the publication of draft ward formation is as below.**

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Date ----------<br>At --------- a.m.<br>Place --------------------<br>--------------------<br>-------------------- |
| 2 | Date of publishing the draft copy of ward formation | --------day, Date -- -------------- |
| 3 | Last date of submitting Objections & Suggestions (To be submitted to The Municipal Commissioner for Objections & Suggestion, in Election Office or concerned ward Office) | ----------day, Date---------------<br>to<br>----------day, Date----------------<br>(upto 3.00 p.m.) |
| Note : The Citizens who have filed Objections & Suggestions will be informed separately for the hearing to attend. | | |

**Place :-** **Commissioner,**

**Date :** **-----------Municipal Corporation**

# परिशिष्ट ११

## (महानगरपालिका निवडणूकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे)

१. महानगरपालिकेच्या आरक्षणाची सोडत राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिवशी काढण्यात यावी.
२. सोडतीच्या तीन ते चार दिवस अगोदर सोडतीची रंगीत तालीम निश्चितपणे करण्यात यावी.
३. सोडतीचे इतिवृत्त लिहिण्यात यावे.
४. सोडत महानगरपालिका आयुक्त यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात यावी.
५. सोडतीसाठी व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीसाठी करावयाच्या जाहिर सूचनेचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने परिशिष्टांमध्ये विहित केल्यानुसार राहील. ही सूचना सोडतीच्या दोन/तीन दिवस आधी किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.
६. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरण्यात यावा.
७. ड्रममध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी **A4** या आकाराचा असावा.
८. चिठ्ठी रोल करुन त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावे व ते चिठ्ठीच्या मध्यभागी लावावेत.
९. सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचा हद्दी दर्शविणारा स्वतंत्र नकाशा ठळकपणे दिसेल अशारितीने लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सीमा सोडतीच्या वेळी स्पष्ट करण्यात याव्यात.
१०.सोडत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात यावी.
११.कोणत्या पदांच्या आरक्षणाची सोडत कोणत्या प्रभागातून कशाप्रकारे काढण्यात येणार आहे याची सविस्तर माहिती दर्शविणारे पत्रक तयार करून सर्व उपस्थितांना वाटण्यात यावे तसेच त्याला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.
१२.सोडतीमध्ये आलेला जागा क्रमांक प्रोजेक्टरद्वारे मोठया पडद्यावर दाखविण्यात यावा.
१३.संपूर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे.
१४.सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.
१५.नागरिकांना सविस्तर माहिती देण्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक तयार करुन त्यास पुरेशा आधी खाली नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी.

i) महानगरपालिकेच्या सूचनाफलकावर
ii) महानगरपालिका प्रभाग समितीच्या सूचना फलकावर
iii) महानगरपालिकांच्या इतर कार्यालयांमध्ये सूचनाफलकावर
iv) स्थानिक केबल टिव्हीवर
v) फ्लेक्स बोर्ड तयार करून शहरात मुख्य ठिकाणी लावण्यात यावेत.

................

## परिशिष्ट १२ (आरक्षणाची सोडत काढल्यानंतर भरावयाचे)

महानगरपालिकेचे नाव: सोडतीचा दिनांक:

| सदस्य संख्या | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण | | | | | |
| पैकी महिला | | | | | |

| प्रभाग क्र. | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|
| १ | १ अ | |
| | १ ब | |
| | १ क | |
| | १ ड | |
| २ | २ अ | |
| | २ ब | |
| | २ क | |
| | २ ड | |
| ३ | याप्रमाणे | |

महानगरपालिका आयुक्त

## परिशिष्ट १३ (आरक्षणाची सोडत काढल्यानंतर भरावयाचे)

महानगरपालिकेचे नाव: सोडतीचा दिनांक:

| अ.क्र. | तपशिल | जागा क्रमांक | पैकी महिलांकरीता आरक्षित झालेल्या जागांचे क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

महानगरपालिका आयुक्त

# परिशिष्ट १४

## -------------------महानगरपालिका

दिनांक :---------------

## अधिसूचना

क्रमांक : ---------------------------, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई ५९) (यापुढे "अधिनियम" म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ५ (३), ५ अ व कलम १४ अन्वये प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. सदर अधिसूचनेव्दारे ----------- महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील.

२. आणि ज्याअर्थी, प्रारुप मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ५, पोटकलम (३) च्या परंतुकाप्रमाणे ---------- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावयाचा आहे. ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र. -----------------------, दिनांक -----नुसार सदर अधिसुचनेचा प्रारुप मसुदा राजपत्रात प्रसिध्द करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. आणि त्यानुसार सदर प्रारुप मसुदा प्रसिध्द करण्यात येत असून , उक्त अधिसूचनेचा मसुदा दि. ---------नंतर आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी विचारात घेतील.

३. उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती किंवा सूचना असल्यास आयुक्त, --------- महानगरपालिका यांचेकडे दिनांक ---------------- रोजी किंवा तत्पूर्वी लेखी सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

## प्रारुप अधिसूचना

ज्याअर्थी,राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ अ च्या तरतुदीखाली -------- महानगरपालिकेच्या बाबतीत खालील दर्शविल्याप्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत.

१. निवडावयाच्या सभासदांची संख्या --

२. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या

अ) अनुसूचित जाती --

ब) अनुसूचित जमाती --

क) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग --

३. स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसह राखून ठेवावयाच्या जागा धरुन ) --

४.उपरोक्त क्र. ३ पैकी वरील क्र.२ (अ),(ब), (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

अ) अनुसूचित जाती --

ब) अनुसूचित जमाती --

क) नागरीकांचा मागासवर्ग --

ड) स्त्रियांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या ( अनुक्रमांक ३ समोरील नमूद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक ४ (अ,ब,क) समोरील नमूद केलेल्या जागांची संख्या) --

५. अनारक्षित जागा --

२. त्याअर्थी, आता राज्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५(३), ५ अ व कलम १४ अन्वये उक्त महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल

त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत असून, ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

३. या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ ही अधिसूचना अंमलात येईल.

## अनुसूची

| प्रभाग क्रमांक व लोकसंख्या | प्रभागाचे नाव, असल्यास | प्रभागाची व्याप्ती | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी वा स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती स्त्री/ अनुसूचित जमाती स्त्री/ नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्रीयांसाठी धरुन) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १.<br>लोकसंख्या<br>एकूण -<br>अ.जा.-<br>अ.ज.- | | व्याप्ती -<br>उत्तर -<br>पूर्व -<br>दक्षिण -<br>उत्तर - | १ - अ<br>१ - ब<br>१ - क<br>१ - ड |
| २.<br>लोकसंख्या<br>एकूण -<br>अ.जा.-<br>अ.ज.- | | व्याप्ती -<br>उत्तर -<br>पूर्व -<br>दक्षिण -<br>उत्तर - | १ - अ<br>१ - ब<br>१ - क<br>१ - ड |

टीप :-

(१) अनुसूचीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह ) राखून ठेवलेले प्रभाग हे दिनांक ------------- रोजी काढलेल्या चिठ्ठया (लॉटस) प्रमाणे निर्दिष्ट करण्यात आले आहेत.

(२) प्रभाग रचना अंतिम करताना कोणत्याही प्रभागाच्या हद्दीमध्ये बदल झाल्यास व त्यामुळे आरक्षणात फेरबदल आवश्यक असल्यास आरक्षणाची सोडत पुन्हा काढण्यात येईल.

(३) महानगरपालिकेच्या क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध राहतील.

( ------------- )
आयुक्त,
------------महानगरपालिका

ठिकाण :
दिनांक :

परिशिष्ट १५

**--------------------MUNICIPAL CORPORATION**

dated ..............................

No.------------------------------------------- The State Election Commissioner, Maharashtra proposes to make the following Draft Notification under section 5 (3), 5 A and Section 14 of the Maharashtra Municipal Corporation Act, (Bom.LIX of 1949) (hereinafter referred to as the "said Act") to fix for the ----------------Municipal Corporation, the number and the extent of the wards into which the said municipal area shall be divided and to specify the wards reserved for the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens and Women (including women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens), as the case may be, as shown in the Schedule to this Draft order.

2. And whereas the said Draft Order is hereby published as required by the section 5(3) of the said Act for information of all the residents within the jurisdiction of the ----------------Municipal Corporation. And Whereas, vide order No.- - - - - - - - - - - - - - - - - - - - -dated - - - - - - -The State Election Commission, Maharashtra, has conferred its rights to Municipal Commissioner,----------------------Municipal Corporation to publish the draft in the Official Gazette. Accordingly this Draft Notification is being published and the said draft will be taken into consideration by the State Election Commissioner, Maharashtra or the officer authorised by him for this purpose after -------------

3. And whereas, all persons who desire to raise any objections or suggestions to this draft should submit the same to the Municipal Commissioner, ------------------ Municipal Corporation, in writing with reasons on or before dated.................................. Objections or suggestions received thereafter will not be considered.

# Draft Notification

WHEREAS, The State Election Commissioner, Maharashtra has specified for -----------Municipal Corporation, under Section 5A of the Maharashtra Municipal Corporations Act, the number of seats to be reserved for the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens and Women (including women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens) as shown below: -

1. The Number of Councilors to be elected --
2. The Number of seats to be reserved
   - (a) For the Scheduled Castes --
   - (b) For the Scheduled Tribes --
   - (c) For the Backward Class of Citizens --
3. The total number of seats to be reserved for women -- (Including women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens)
4. Out of seats at serial number 3, the number of seats reserved for the women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens, from amongst the seats reserved for the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens, as shown in item at serial number 2(a), (b) and (C) respectively are as under:-
   - (a) For the Scheduled Casts --
   - (b) For the Scheduled Tribes --
   - (c) For the Backward Class of Citizens --
   - (d). Number of seats reserved for women as general category -- (Number of seats at serial number 3 minus seats at serial number 4)
5. Unreserved seats --

2. Now, therefore, in exercise of section 5(3), 5A and Section 14of the Maharashtra Municipal Corporation Act, The State Election Commissioner, Maharashtra State hereby fix the number and extent of the wards into which the said Municipal Corporation area shall be divided and specify the wards in which seats shall be reserved for the Scheduled Castes, the Scheduled Tribes, the Backward Class of the citizens and women (including women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes, the Backward class of citizens), as the case may be, as shown in the schedule to this Notification.

3. This Notification shall take effect for the purpose of the next general election held immediately following the date of this Notification.

SCHEDULE

| Ward No. & Population | Name of the ward, if any | Extent of the Ward | If the seat is reserved for whom i.e. whether for Scheduled Castes / Scheduled Tribes / Backward Class of Citizens or for women (including SC Women, ST Women or BCC Women) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1.<br>Population<br>Total-<br>SC -<br>ST - | | Location –<br>North-<br>East-<br>South-<br>West- | 1A -<br>1B -<br>1C-<br>1D - |
| 2.<br>Population<br>Total-<br>SC -<br>ST - | | Location –<br>North-<br>East-<br>South-<br>West- | 1A -<br>1B -<br>1C-<br>1D - |

NOTE:-

1. The Reservation indicated in the Schedule for the Backward Class of citizens and women including seats reserved for women belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Backward Class of Citizens is as per the lots drawn on ...............

2. While finalising the wards, if limits of any ward are changed and due to which change in reservation becomes necessary then draw for reservation will be done again.

3. A map of the Municipal Corporation showing the limits of the wards is available during office hours for inspection in the office of the Municipal Corporation.

(-----------------------)
Municipal Commissioner,
--------------Municipal Corporation

Place :-
Date :- / /